2 4 JUN 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आता मियावाकी जंगल

## क्रीडा संकुलाच्या परिसरात वृक्षारोपण : १५८ रोपांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलाच्या शेजारील परिसरामध्ये मियावाकी जंगल (दाट वनराई) लागवडीस शनिवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते जांभूळ रोप लावून प्रारंभ करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते बहावा आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते कांचन रोपे लावण्यात आली.

क्रीडा संकुल परिसरातील साडेसात गुंठ्यांच्या परिसरात बहावा, कांचन, जांभूळ, चिंच, विलायती चिंच, फणस, जास्वंद, अडुळसा, रातराणी, तगर, चाफा, धावडा आणि बांबू अशा तेरा प्रजातींच्या एकूण १५८ रोपांची लागवड करण्यात आली. ही सर्व रोपे शिवाजी विद्यापीठाच्या रोपवाटिकेत तयार करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे अशा प्रकारे विद्यापीठाच्या परिसरात दहा विविध ठिकाणी मियावाकी जंगलांची निर्मिती करण्याचा मानस आहे, अशी माहिती उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी दिली. मियावाकी जंगल ही दाट वृक्षारोपणाची मूळ जपानी संकल्पना असून त्याअंतर्गत विविध प्रकारच्या प्रजातींची गर्द, दाट वनराई होईल, अशा प्रकारे लागवड करण्यात येते. त्यामुळे या परिसरात वनस्पतींच्या वैविध्यतेबरोबरच जैवविविधतेचाही मोठ्या प्रमाणात विकास होतो. विविध प्रकारचे पशु-पक्षी या वनराईच्या आश्रयास राहावयास येत असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

> शिवाजी विद्यापीठाने गर्द वनराईची निर्मिती हाती घेऊन जैवविविधता विकासाच्या दृष्टीने या मियावाकी जंगल लागवडीच्या माध्यमातून एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.
>
> \- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

2 4 JUN 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन!

## शिवाजी विद्यापीठ : १६ हजार विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा बुधवारपासून सुरू होणार


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक परीक्षा (प्रॅक्टिकल) ऑनलाईन पध्दतीने घेण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्यावतीने कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन स्वरूपात होणार आहेत. ऑनलाईन पर्याय नोंदविलेल्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील १६ हजार विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा बुधवार (दि. ३०) पासून ऑनलाईन होणार आहे.

गेल्यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भावामध्ये वाढ होण्यापूर्वी विद्यापीठातील बहुतांश अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा पूर्ण झाल्या होत्या. ज्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता आली नाही. त्यांना विद्यापीठाने निश्चित केलेल्या सूत्रानुसार या परीक्षांचे गुण देण्यात आले. यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वर्ग ऑनलाईन पध्दतीने भरले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा यूजीसीच्या सूचनेनुसार ऑनलाईन स्वरूपात विद्यापीठाकडून घेतल्या जाणार आहेत. त्यामध्ये बी. एस्सी., एम. एस्सी. अभ्यासक्रमांतील अधिक विषयांच्या परीक्षांचा समावेश आहे. याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळांनी घेतलेल्या निर्णयानुसार संलग्रित महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध अधिविभागांना सूचना केल्या जाणार आहेत. ऑफलाईनकडून ऑनलाईन पर्याय नोंदविलेल्या आणि तांत्रिक अडचणीमुळे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नव्हती. अशा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील १६ हजार विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा ऑनलाईन पध्दतीने बुधवारपासून होणार आहे. त्याचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झाले आहे. विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ६२१ परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. त्यापैकी ९५ टक्के परीक्षांचे निकाल आतापर्यंत जाहीर करण्यात आले असल्याची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

### आजपासून 'मॉक टेस्ट'

ऑनलाईन स्वरूपात होणाऱ्या पुनर्परीक्षेसाठीची सराव चाचणी (मॉक टेस्ट) आज, गुरुवारपासून परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून घेतली जाणार आहे. त्याबाबतचे संदेश विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले आहेत.



2 4 JUN 2021
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र तासगावला

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सांगली जिल्ह्यात व्हावे, अशी बऱ्याच वर्षांपासूनची मागणी होती. मंत्रालयात आज या संबंधी बैठक झाली. यात तासगाव तालुक्यातील बस्तवडे येथे उपकेंद्र करण्याच्या निर्णयाला तत्त्वतः मान्यता मिळाली. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी याची माहिती दिली. लवकरच जागेची पाहणी करून त्याचा अहवाल शासनाला सादर केला जाईल. त्यानंतर हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू होईल.

> तत्त्वतः मान्यता मिळालेल्या जागेची पाहणी करून त्या संदर्भातील अहवाल शासनाला सादर करणार आहोत. त्यानंतर जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू होईल. त्यापुढील कार्यवाही करून लवकरात लवकर हे उपकेंद्र कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू.
> - ॲड. धैर्यशील पाटील,
> सदस्य, व्यवस्थापन परिषद, शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाचा विस्तार तीन जिल्ह्यांत आहे. काळाच्या ओघात तीनही जिल्ह्यातील महाविद्यालयांची संख्या वाढली असून , प्रशासनाच्या दृष्टीने विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याची मागणी वारंवार केली होती. काही वर्षांपूर्वी प्रकुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली एक समितीही नेमली. मात्र, यात पुढे काही झाले नाही. त्यानंतर २०१९ ला व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती स्थापन झाली. तत्कालीन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगली जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी काळम पाटील यांच्याबरोबर एक बैठक आयोजित केली होती. त्यावेळी जिल्हधिकाऱ्यांनी एका जागेचा प्रस्तावही दिला होता. मात्र, त्यानंतर यामध्ये फारसे काही घडले नाही. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री सामंत यांच्या उपस्थितीत मंत्रालयात एक ऑनलाईन बैठक झाली. यात तासगाव तालुक्यातील बस्तवडेतील प्रस्तावाला तत्त्वतः मान्यता देण्यात आली. जागा हस्तांतरणासह अन्य प्रक्रियाही पुढील काळात लवकरच मार्गी लागतील, असे प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 JUN 2021
सकाळ

» दृष्टिक्षेपात

# विद्यापीठातील १६ हजार विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा

**कोल्हापूर :** ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली नव्हती, त्यांची पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. सुमारे १६ हजार विद्यार्थी ही पुनर्परीक्षा देतील. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन होणार आहे. या परीक्षा ३० जूनपासून सुरू होतील. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा यूजीसीच्या सूचनेनुसार ऑनलाईन स्वरूपात विद्यापीठाकडून घेतल्या जाणार आहेत. त्यात बी. एस्सी., एम. एस्सी. अभ्यासक्रमांतील अधिक विषयांच्या परीक्षांचा समावेश आहे. याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळांनी घेतलेल्या निर्णयानुसार संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध अधिविभागांना सूचना केल्या जातील. ऑफलाईनकडून ऑनलाईन पर्याय नोंदविलेल्या आणि तांत्रिक अडचणीमुळे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नव्हती. अशा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील १६ हजार विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा ऑनलाईन पद्धतीने बुधवारपासून होणार आहे. त्याचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 JUN 2021
पुढारी

# विद्यापीठात रविवारपासून ऑनलाईन संगीत महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संगीत व नाटयशास्त्र विभागातर्फे दि. २७ व २८ जून रोजी दोन दिवसीय ऑनलाईन संगीत महोत्सवाचे आयोजन केले आहे. पहिल्या दिवशी मुग्धा गावकर व प्राची जठार, गोवा, यांचे सहगायन होणार आहे. दुसऱ्या दिवशी डॉ. उदय कुलकर्णी, गोवा यांचे एकल तबलावादन होईल. सायंकाळी ६ वाजता यू ट्यूबद्वारे थेट प्रसारण होईल. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या यू ट्यूब चॅनेलवर आस्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
2 4 JUN 2021 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र तासगावला

## मंत्रालयातील बैठकीत तत्वत: मंजुरी : प्रक्रिया तत्काळ पूर्ण करण्याची सूचना

प्रतिनिधी
कोल्हापूर

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील बस्तवडे येथे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्यास मंत्रालयात झालेल्या बैठकीत तत्वत: मंजुरी देण्यात आली. उपकेंद्र सुरु करण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी सूचना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी बैठकीत केली.

शिवाजी विद्यापीठाचा विस्तार तीन जिल्ह्यात आहे. तीनही जिल्ह्यात सध्या महाविद्यालयांची संख्या वाढली आहे. प्रशासनाच्या दृष्टीने विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्याची मागणी वारंवार होत होती. काही वर्षांपूर्वी प्र-कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली एक समितीही नेमण्यात आली होती. मात्र यात पुढे काही झाले नाही. त्यानंतर



व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २०१९मध्ये दुसरी समिती स्थापन झाली. तत्कालीन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगलीचे तत्कालीन जिल्हाधिकारी काळम पाटील यांच्यासोबत बैठक घेतली होती. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी एका जागेचा प्रस्तावही दिला. त्यानंतर यामध्ये फारसे काही घडले नाही.

शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र तासगाव येथे सुरु करण्यासंदर्भात बुधवारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

> उपकेंद्राला तत्वत: मान्यता मिळालेल्या जागेची पाहणी करुन त्या संदर्भातील अहवाल शासनाला सादर करणार आहे. त्यानंतर जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु होईल. त्यापुढील कार्यवाही करुन तातडीने हे उपकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.
>
> **- ॲड. धैर्यशील पाटील,**
> **सदस्य व्यवस्थापन परिषद**
> **शिवाजी विद्यापीठ**

यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीमध्ये उपकेंद्र सुरु करण्यास तत्वत: मंजुरी देण्यात आली. यावेळी मंत्री सामंत म्हणाले, माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांची

पान ९ पहा

## शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र तासगावला

पान १ वरून

शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र तासगांव येथे सुरु व्हावे असे अनेक दिवसांपासूनचे स्वप्न होते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील होतो. आज त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळाली, ही समाधानकारक बाब आहे. या उपकेंद्रामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील. उपकेंद्र तातडीने सुरु करण्यासाठी शासनस्तरावर सर्व सहकार्य करण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले. बैठकीला आमदार सुमनताई पाटील, उच्च शिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, ॲड. धैर्यशील पाटील, रोहीत पाटील आदी उपस्थित होते.